



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे  अंक : २३६ वा  गुरूवार दि १३ नोव्हेंबर २०२५  पृष्ठ ८  किंमत ३ रुपये

# नगराध्यक्षपदाकडे सर्वांची लागली नजर,युतीची शक्यता धूसर!

## आरोप- प्रत्यारोपातून भाजप- सेनेत तीव्र संघर्षाचे दिसतात संकेत : दिग्गजांची लागली प्रतिष्ठा पणाला...

जनसंचलन/बुलढाणा

**राजकीयदृष्ट्या संवेदनशील पण थंड हवेचे शहर अशी ओळख असलेल्या बुलढाणा शहरात राजकीय तापमान वाढले असून, निवडणुकीचे वारे वेगाने वाहू लागले आहेत. बहुप्रतीक्षित नगरपालिकेच्या निवडणुकीवरून राजकारण प्रिय बुलढाणेकरांमध्ये उत्साह संचारला आहे. प्रामुख्याने, युतीतील घटक पक्षांच्या नजरा पालिका अध्यक्षपदाकडे लागल्या असतानाच आरोप प्रत्यारोप वाढत चालल्याने युतीची शक्यता धूसर झाल्याचे पहायला मिळत आहे. यामुळे, नगराध्यक्षपदासाठी कट्टर विरोधक असलेल्या दिग्गजांची प्रतिष्ठाही पणाला लागली आहे.**

नगर पालिकेची निवडणूक यंदा चुरशीचा कळस गाठणारी ठरणार आहे. विशेष म्हणजेभाजप- सेनेच्या नेत्यांनी युतीसंदर्भात भूमिका स्पष्ट करताना नगराध्यक्ष पदावर आपलाच दावा असल्याचे माध्यमांना सांगितले होते. यानंतर, दोन्ही पक्षाशी निगडीत असलेली एक राजकीय घटना संघर्ष तीव्र उफाळण्यास कारणीभूत ठरली. प्रारंभी यंदाची लढत महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यातच होणार असे चित्र होते. मात्र भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार विजयराज शिंदे व आमदार संजय गायकवाड यांच्यात गंभीर आरोप प्रत्यारोपांची जुगलबंदी रंगली. त्यामुळे दोघांनी स्वबळाची तयारी चालविली आहे. मात्र भाजपा व अजितदादा गटात युती होण्याची शक्यता आहे.

## तिरंगी लढतींचे चिन्हे असू शकतात!

**काँग्रेसतर्फे शहराध्यक्ष दत्ता काकस यांच्या अर्धांगिनी लक्ष्मी काकस यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी उमेदवाराचे नाव गुप्तच ठेवले आहे. मात्र त्यांना कोणत्याही स्थितीत पालिकेतील सत्ता अबाधित ठेवणे आहे. त्यामुळे त्यांच्या पत्नी तथा माजी पालिका अध्यक्ष पूजा गायकवाड या रिंगणात उतरू शकतात. भाजपा तर्फे ६ जण इच्छुक आहे. त्यात भाजपा जिल्हाध्यक्ष शिंदे यांच्या अर्धांगिनी अर्पिता शिंदे यांचाही समावेश आहे. अटीतटीच्या स्थितीत त्या उमेदवार राहू शकतात.**






## मागील लढतेचा आराखडा पाहूया...

गत निवडणुकीत एकसंघ शिवसेनेला सर्वाधिक म्हणजे १० जागा मिळाल्या. काँग्रेसला ७, भाजपला ५, एकसंघ राष्ट्रवादीला ३ जागा मिळाल्या होत्या. एका जागी अपक्षाने बाजी मारली. दोन जागी विजय मिळविणाऱ्या भारिप ने थेट अध्यक्ष पदाच्या लढतीत देखील बाजी मारत मोठा उलटफेर केला होता. अध्यक्षपदी भारिप च्या नजमुन्नीसा मोहम्मद सज्जाद या विजयी झाल्या होत्या.

# लोणीगवळी येथे चार घरांत चोरट्यांनी केली चोरी !

जनसंचलन/ डोणगाव

डोणगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लोणीगवळी येथे ११ नोव्हेंबरच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी सलग चार बंद घरे फोडल्याची घटना घडली. तसेच, आणखी एका घराची कडी बाहेरून लावल्याचेही समोर आले असून, गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेत माधव कल्याणकर, पिंटू कल्याणकर, अरविंद अवचार आणि रमेश जागृत यांच्या बंद घरांवर चोरट्यांनी डल्ला मारला. चोरी किती झाली आणि नेमके काय चोरले गेले, याबाबत तपास सुरू आहे. १२ नोव्हेंबरच्या सकाळी ही घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी गर्दी केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रशांत पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मिलिंद अवचार आणि प्रा. विजय जागृत यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. प्रशांत पाटील यांनी तत्काळ डोणगाव पोलिस ठाण्यात जाऊन ठाणेदार अमरनाथ नागरे यांना घटनेची सविस्तर माहिती दिली. त्यांनी लोणीगवळी परिसरात पोलिस गस्त वाढविण्याची तसेच बेजबाबदार बीट जमादार संजय घिके यांची बदली



करून दुसऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्याची मागणी केली. या प्रकरणी अद्याप औपचारिक तक्रार दाखल झालेली नसली, तरी पोलिसांनी प्राथमिक चौकशी सुरू केली आहे. दरम्यान, काही दिवसांपासून गावात अज्ञात व्यक्तींची वर्दळ वाढल्याची माहिती स्थानिकांनी पोलिसांना दिली आहे.

# क्षुल्लक कारणावरुन मारहाण; एकावर गुन्हा

जनसंचलन/ शेगाव

लग्न सोहळ्यात किरकोळ कारणावरून वाद होऊन दोघा भावांना मारहाण केल्याची घटना ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता अकोट रोडवरील लालबाबा देवी मंदिरासमोर घडली. या प्रकरणी शेगाव पोलिसांनी अकोला जिल्ह्यातील म्हैसांग येथील एका युवकावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत संतोष दादाराव आगलावे (वय २१, रा. मासा (सिसा), ता. जि. अकोला) यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ते नातेवाईकांच्या लग्नात उपस्थित असताना आरोपी आनंद चव्हाण (रा. म्हैसांग, ता. जि. अकोला) याने त्यांना धक्का दिला. त्यावर संतोष यांनी विरोध व्यक्त केला असता, आरोपीने शिवीगाळ



करून हातातील स्टीलच्या कड्याने संतोष यांच्या उजव्या डोळ्याजवळ, नाकावर आणि गालावर वार केले. दरम्यान, भांडण थांबविण्यासाठी संतोष यांचा चुलत भाऊ महादेव नामदेव आगलावे पुढे आला असता, त्यालाही आरोपीने छाती, बरगड्या आणि डोक्यावर कड्याने मारहाण केली. तसेच दोघांना जिवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीच्या तक्रारीवरून व वैद्यकीय अहवालाच्या आधारे गुन्हा दाखल केला.

# घाऊक घसरणीचा गुणाकार...

## संपादकीय लेख

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दरम्यान महाराष्ट्रातील अव्वल दर्जाच्या काही नेत्यांच्या भोवती वादाची वादळे घोंगावली. त्यामुळे राजकारणाचा स्तर घसरल्याची चर्चा समाजातील उदारमतवादी बुद्धिवंतात नेहमीप्रमाणे होऊ लागली. मात्र अशी राजकारणाच्या स्तराबाबत वरवर चर्चा केल्याने त्याचे मूळ कारण समजणे शक्य नाही. संजय गायकवाड, संजय शिरसाट, योगेश कदम, माणिकराव कोकाटे, जितेंद्र आव्हाड-गोपीचंद पडळकर या काही प्रमुख राजकीय नेत्यांच्या भोवती अधिवेशनात वा त्यानंतर लगेचच तयार झालेली वादळे ही राजकारणाचे ङ्गमवालीकरणफ (लुम्पनायझेशन) अधोरेखित करणारी आहेत यात वाद नाही. कारण ही एक सार्वत्रिक प्रक्रिया असल्यासारखे घाऊक मात्रेत राजकारणी सामान्य नितीमूल्ये देखील बिनधास्त पायदळी तुडवताना या निमित्ताने दिसली. मात्र हे ङ्गमवालीकरणफ नेमके कशामुळे झाले व त्याची सुरुवात कशी झाली हे समजून घेतल्याशिवाय त्यावर केलेली टीका ही निरर्थकच ठरेल. राजकारणात जनतेच्या राजकीय नेत्यांप्रति असलेल्या धारणांना सर्वाधिक महत्त्व असते. जनतेच्या धारणा या विशिष्ट विचारधारेला अनुसरून बनवण्याकरिताच संघटित स्वरूपात राजकीय पक्ष विविध कार्यक्रमांद्वारे सातत्याने काम करत असतात. मात्र जनतेच्या धारणा तयार होण्यावर समाजातील इतर असंख्य शक्तींचाही मोठा प्रभाव असतो. यात सांस्कृतिक घटनांबरोबरच अर्थकारणाचा सगळ्यांत मोठा वाटा असतो. राजकारणासाठी लागणारा पैसा ही आजच नव्हे, तर स्वातंत्र्यापूर्वीपासूनच अपरिहार्य गरज राहिलेली आहे. अगदी स्वातंत्र्यापूर्वीदेखील काँग्रेसपासून ते प्रमुख उजव्या विचारधारेच्या शक्तींना देशातील प्रमुख उद्योजक घराणी निधीचा कसा अव्याहत पुरवठा करत असत, याचे दाखले अक्षय मुकूल यांच्या ङ्गगीता प्रेस अँड मेकिंग ऑफ हिंदू इंडियाफ या पुस्तकात दिलेले आहेत. मात्र संघटना चालवण्यासाठी लागणाऱ्या अपरिहार्य निधीची पूर्तता भांडवली वा अर्ध भांडवली समाजात करण्याचा तो सर्वमान्य नितीमत्तेत बसणारा मार्ग त्याकाळी होता. नव्वदच्या दशकात विकसित देशांनी अविकसित देशांवर कर्जे घेण्यासाठी ङ्गस्ट्रक्चरल अॅडजस्टमेंटफच्या माध्यमातून अर्थव्यवस्था खुली करण्याचा जो कार्यक्रम लादला, त्याचे आर्थिक परिणाम तर झालेच; मात्र त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय परिणामांचा फारसा अंदाज तात्काळ अनेकांना आला नाही. आता कालांतराने ते स्पष्ट दिसू लागले आहेत. खुली अर्थव्यवस्था स्वीकारल्यानंतर सांस्कृतिक क्षेत्रात तर खूपच मोठे बदल झाले. मनोरंजन वाहिन्यांवरून सुरू झालेल्या मालिकांनी सर्वसामान्यांच्या नेणिवा या, कोणत्याही मार्गाने आलेला पैसा हीच प्रगती या पातळीवर घडवल्या. त्या मालिकांमध्ये सदासर्वकाळ महालवजा घरात सतत मेकअप करून, चांगले कपडे घालून वावरणारी पात्रे अगदी गरिबी रेषेखालील लोकांच्याही मानसिकतेवर परिणाम करू लागली. गोदीतील हमाल ङ्गहिरोफ होऊ शकतो म्हणून थेटरचे स्टॉल फुल करणाऱ्यांना मल्टिप्लेक्सेसची तिकीटे परवडेनाशी झाली. त्यात दाखवल्या जाणाऱ्या करण जोहरच्या सिनेमांची कथानके त्यांना जादुई वाटावीत, इतकी त्यांच्या जीवनाच्या विपरीत होती. ङ्गधूमफसारख्या सिनेमांतून चोरालाच हिरो दाखवूनही लोकांना ते आवडले होते. दुसरीकडे नव्या आर्थिक धोरणामुळे राजकीय क्षेत्रात स्वातंत्र्यापश्चात निवडणुकीत सुरू झालेले पैशाच्या वापराचे प्रमाण प्रचंड वाढले. तसेच या वापराचे व्यावसायीकरण अशा पातळीवर गेले की एखाद्या कॉर्पोरेट कंपनीत हार्वर्डवरून बिझनेस मॅनेजमेंट करून आलेल्या सीईओने देखील तोंडात बोटे घालावीत. या धोरणामुळे देशातील विषमतेत जी प्रचंड वाढ झाली ती आता टोकाला गेली आहे. देशातील १० टक्के लोकांकडे देशातील ७७ टक्के संपत्ती एकवटली आहे. सन २०१७मध्ये देशात तयार झालेल्या संपत्तीतील ७३ टक्के वाटा हा केवळ एक टक्के लोकांकडे गेला. दुसरीकडे सर्वांत गरीब असलेल्या ६७ कोटी लोकांच्या संपत्तीत या काळात केवळ एक टक्काच वाढ झाली. या आकड्यांच्या खेळाचे अनेकांना वावडे असते, त्यामुळे यात फारसे जायला नको. आरोग्य आणि शिक्षण या जनतेच्या मूलभूत गरजा. त्या तशा मानून त्याची जबाबदारी कल्याणकारी राज्यात घेतली जाते. स्वातंत्र्यापश्चात ती किमान पातळीवर का होईना, घेतली जात होती. ते कल्याणकारी राज्य संपण्याची सुरुवात होणे हा ङ्गमनमोहनॉमिक्सफच्या नावाने सुरू केल्या गेलेल्या नवउदारवादी धोरणाचाच परिपाक आहे. हल्लीच्या राजकारणात पं. नेहरूंच्या राजकीय धोरणांवर सातत्याने टीका करणे हा प्रघात झाला आहे. मात्र नव्वदच्या दशकात आलेल्या आर्थिक उदारीकरणानंतर ङ्गनेहरुव्हियन इकॉनॉमिक्सफच्या नावाने नेहरूंच्या कल्याणकारी अर्थनितीवर काँग्रेसच्याच धुरिणांकडून टीका करणे सुरू झाले होते. आज सर्वसामान्यांना साध्या साध्या आजारांचे उपचार करणेही दुरापस्त झालेले आहेत. बीए, एमएसाठी लाखोंचे शुल्क घेतले जात आहे. आयआयटीत पन्नास-शंभर रुपयात शिकलेली स्वातंत्र्यानंतरची पिढी या वाढलेल्या शुल्काची तुलना दर्जाशी करती झाली आहे. यातून समाजातील बहुसंख्य वर्ग त्यांच्या जीवनाचा स्तर उंचावण्यापासून दररोज दूर फेकला जात आहे. या सगळ्याचा मोठा दबाव राजकारणावर पडतो आहे. सरंजामी व्यवस्थेचे असंख्य गुण अद्यापही नेणिवेत असलेला समाज अशा प्रकारच्या कोडींतून मार्ग काढण्यासाठी कायम सोपी उत्तरे शोधत असतो. त्यामुळे त्यांच्या दररोजच्या खडतर जीवनात छोटी मोठी मदत करणारा त्यांच्यासाठी देव असतो. त्यातच त्यांच्या आयुष्यात छोट्या मोठ्या उत्सवाच्या निमित्ताने येणाऱ्या आनंद सोहळ्यांना आर्थिक रसद पुरवली की तर त्या देवाचा परमेश्वरच होतो. त्यामुळे लोकप्रतिनिधी असो वा त्या स्पर्धेत असलेला मुख्य स्पर्धक असो, प्रत्येकाला सार्वजनिक गणेशोत्सव, साईबाबा पालखी, गोविंदा, अष्टविनायक दर्शन, इद ए मिलाद उन नबी, मोहर्रमचा खिचडा-शरबत, अजमेरच्या दर्ग्याची यात्रा यांसाठी निधीची पूर्तता करावीच लागते. तसेच लोकप्रतिनिधींनी ङ्गसंपर्क कार्यालयफ म्हणून जी दुकानांची जागा घेतलेली असते त्यात दररोज असंख्यांची रीघ लागलेली असते. त्यात येणाऱ्या बहुतांश लोकांची गाऱ्हाणी ही, आई/वडील, मुलगा/मुलगी, भाऊ/बहीण आजारी आहे, हॉस्पिटलचा खर्च प्रचंड आहे, मुला/मुलीची अॅडमिशन आहे, कॉलेज डोनेशन मागते आहे... याच प्रकारात मोडणारी असतात. या सुविधा पुरवणाऱ्या सरकारी संस्था पार मोडीत निघण्याची नव्वदच्या दशकापासून सुरू झालेली प्रक्रिया आता जवळपास पूर्णत्वाला गेलेली आहे. त्यामुळे सरकारी रुग्णालयात उपचार होत नसल्याने वा खासगी रुग्णालये, सरकारी योजनांखाली रुग्णांना दाखलच करून घेत नसल्याने मतदारसंघातील मतदाराला छोटी मोठी पैशाची मदत करण्याशिवाय लोकप्रतिनिधींकडे पर्याय नसतो. पूर्वी शिक्षण संस्थाचालकांना फोनवरून विनंतीवजा दम दिला की कामे होत असत, आता तेही खासगीकरणामुळे आपण फार मोठी गुंतवणूक आणल्याचा आभास निर्माण करून कुणाचेच ऐकेनासे झाले आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधीच्या कार्यालयात सर्वसामान्यांनी केलेल्या मागणीचा भागाकार करून रोकड वाटणे हाच दररोजच्या राजकारणाचा पाया झाला आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# महाराष्ट्र काँग्रेसमध्ये अंतर्गत गटबाजीचं ग्रहण, सुनील केदार यांना झटका..

**नागपूर :** नगर परिषद, नगर पंचायत निवडणुकीसाठी काँग्रेसच्या जिल्हा निवड समितीला न जुमानता उमेदवारांच्या म ुलाखती घेणाऱ्या सुनील केदार, अश्वीन बैस गटाला काँग्रेसने जोरदार झटका दिला आहे. येत्या बुधवारी विधानसभा प्रभारी आणि जिल्हा निवड मंडळातील सदस्यांच्या उपस्थितीत पुन्हा बैठक घेण्याच्या आणि बैठकीत घेतलेल्या निर्णयाची माहिती घेऊन गुरुवारी मुंबईत येण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यासंदर्भात पक्षाचे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी जिल्हाध्यक्ष अश्विन बैस यांना पत्र पाठवले आहेसंबंधित पत्रात सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. नागपूर जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकी संदर्भात नागपूर ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हा निवड मंडळाची बैठक झालेली नाही, अशी तक्रार प्रदेश कार्यालयाकडे प्राप्त झाली आहे. त्यामुळे प्रदेशाध्यक्ष





हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेवरून जिल्ह्याच्या निवड मंडळाची बैठकच झालेली नसल्याने बुधवारी मुंबईत होणाऱ्या राज्य निवड मंडळाच्या समोर नागपूर जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी उमेदवार निश्चित करण्यासंदर्भात चर्चा होणार नाही, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्हा निवड मंडळाची बैठक १२ नोव्हेंबरला घ्यावी. या बैठकीत जिल्हा प्रभारी, विधानसभा प्रभारी तसेच जिल्हा निवड मंडळातील सदस्यांना आमंत्रित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या बैठकीत चर्चा झाल्यानंतर १३ नोव्हेंबर, गुरुवारी दुपारी १२.३० वाजता राज्य निवड मंडळासमोर माहिती सादर करावी, अशा सूचना दिल्या आहेत. त्याचबरोबर या बैठकीत नगराध्यक्षपदासाठी इच्छुक असलेल्यांच्या मुलाखती माजी आम दार वीरेंद्र जगताप घेणार असल्याची माहिती आहे.नागपूर जिल्ह्यातील २७ नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या निवडणुका दोन डिसेंबरला होणार आहेत. त्यासाठी काँग्रेसने जिल्हा निवड समिती तयार केली आहे. त्यात आजी-माजी पदाधिकारी आणि वरिष्ठांचा समावेश आहे. त्यांच्या उपस्थितीत मुलाखती घेतल्या जाव्यात अशी पक्षाची अपेक्षा आहे.

ग्रामीण काँग्रेसने गेल्या आठवड्यात शुक्रवारी कार्यालयात मुलाखतींचे आयोजन केले होते. ते करताना त्यांनी पक्षाच्या निवडणूक निरीक्षकांना बोलावले नाही. तसेच पक्षातील विशिष्ट गटाचे कार्यकर्ते बोलावत त्यांच्या मुलाखती घेतल्या. या बैठकीची तक्रार पक्षातील दुसऱ्या गटाने थेट प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्याकडे केली होती.

यानंतर नागपूर ग्रामीणचे प्रभारी माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्यासोबत जिल्हा प्रभारी उदय मघे आणि वरिष्ठ नेते अशोकराव बोबडे नागपुरात दाखल झाले होते. या बैठकीनंतर काँग्रेसमधील गटबाजी पुन्हा एकदा उघड झाली आहे.

## भाजप, ठाकरेसेनेची सारखीच व्यथा, अनेक जागांवर झटका

**मुंबई :** २०२६ मध्ये महापालिकेच्या निवडणुका लागण्याची शक्यता आहे. त्यासाठी काल आरक्षण जाहीर झालं. यामध्ये मुंबईत शिंदेसेनेला मोठी लॉटरी लागली असून भाजप आणि उद्धव ठाकरेंच्या पक्षाला मोठा झटका बसला आहे.मुंबई महापालिकेची अखेरची निवडणूक २०१७ मध्ये झाली. २०२२ मध्ये नगरसेवकांचा कार्यकाळ संपला. तेव्हापासून महापालिकेवर प्रशासक राज आहे. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर मुंबईतील निम्मे माजी नगरसेवक शिंदेसेनेत गेले.

हे सगळे नगरसेवक २०१२ ते २०१७ या कालावधीत पालिकेचे सदस्य होते. यातील बहुतांश माजी नगरसेवक सुदैवी ठरले आहेत. शिंदेसेनेच्या केवळ ९ माजी नगरसेवकांना आरक्षणाचा फटका बसला आहे. याचा अर्थ शिंदेसेनेच्या फक्त १५ टक्के माजी नगरसेवकांना आरक्षणामुळे त्यांच्या प्रभागातून निवडणूक लढवता येणार नाही.मुंबई महापालिकेत एकूण २२७ प्रभाग आहेत. आरक्षण सोडतीचा सर्वाधिक फटका भाजप आणि उद्धवसेनेला बसला आहे. त्यांच्या ३० टक्क्यांहून माजी नगरसेवकांना आरक्षणा मुळे प्रभाग गमवावे लागले आहेत.

## आरक्षण सोडतीने प्रफुल्ल गुडधेंना धक्का

**नागपूर :** नागपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी मंगळवारी अखेर प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत काढण्यात आली. आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या उपस्थितीत कविवर्य सुरेश भट सभागृहात झालेल्या या सोडतीनंतर शहराच्या राजकारणात प्रचंड हालचाल निर्माण झाली आहे. अनेक दिग्गज नगरसेवक आणि माजी पदाधिकाऱ्यांचे राजकीय गणित पूर्णपणे बिघडले आहे, तर काहींच्या गडात अनपेक्षित बदल झाल्याने आगामी निवडणूक अधिक चुरशीची होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.सुमारे २५ वर्षांपासून जयताळा प्रभागातून काँग्रेसचा झेंडा फडकवणारे आणि देवेंद्र फडणवीस यांचे कट्टर विरोधक म्हणून ओळखले जाणारे काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव तसेच वरिष्ठ नगरसेवक प्रफुल्ल गुडधे यांना या आरक्षण सोडतीचा सर्वात मोठा धक्का बसला आहे. जयताळा प्रभाग क्रमांक ३८ मधील तिन्ही जागा महिलांसाठी राखीव ठरल्याने गुडधे यांना यंदा निवडणूक लढवता येणार नसल्याचे दिसत आहे. जयताळा हा प्रभाग मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघात येतो. मात्र,



या आरक्षणामुळे आता काँग्रेसला या गडात नवा उमेदवार शोधावा लागणार आहे. गुडधे यांचा अनुभव आणि प्रभाव निवडणुकीत कितपत उपयोगी ठरेल, याकडे लक्ष लागले आहे. दुसरीकडे, भाजप, काँग्रेस आणि बसपाच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांनाही या आरक्षणामुळे धक्का बसला आहे. बसपाचे जीतेंद्र घोडेवार, संजय बुरेवार, काँग्रेसचे हरीश ग्वालबंशी, रमेश पुणेकर, भाजपचे प्रमोद करोती, विजय चुटेले, संजय बालपांडे, बाल्या बोरकर, भगवान मेंढे, नागेश सहारे, अभय गोटेकर यांच्यासह अनेकांचा प्रभाग आरक्षणामुळे बदलला आहे.

## आरक्षण सोडतीत धक्का ; ठाकरेसेनेच्या तेजस्वी घोसाळकर म्हणाल्या, हा निर्णय दुःखद

**मुंबई :** आरक्षण सोडतीत मुंबई महापालिकेतील काही महत्त्वाचे प्रभाग आरक्षित झाल्यामुळे येथील माजी नगरसेवकांना आपला प्रभाग सोडावा लागणार आहे. त्यामुळे काही जण अन्य वॉर्डातून निवडणूक लढवण्यासाठी चाचपणी करण्याची शक्यता आहे, तर कोणी कुटुंबातीलच एकाला तिकीट देण्यासाठी धडपड करु शकतं. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या तरुण तडफदार नेत्या तेजस्वी घोसाळकर यांचा वॉर्डही आरक्षित झाल्याने त्यांची कोंडी झाली आहे. प्रभाग आता ओबीसी महिलांसाठी राखीव झाला आहे. त्यानंतर तेजस्वी यांनी इन्स्टाग्रामच्या माध्यमातून मोठा निर्णय जाहीर केला आहे.तेजस्वी यांचे पती अभिषेक घोसाळकर यांची गेल्या वर्षी फेसबुक लाईव्ह करुन गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. तेजस्वी या ठाकरे गटाचे दिग्गज नेते विनोद घोसाळकर यांच्या स्नुषा आहेत. पक्षांतर्गत नाराजीतून तेजस्वी घोसाळकर यांनी संघटनेतील पदांचा राजीनामाही दिला होता. त्यानंतर त्या पक्षांतर करण्याच्याही चर्चा रंगल्या होत्या. परंतु उद्धव ठाकरे यांच्या भेटीत त्यांची नाराजी दूर झाली. मात्र आता त्यांचा प्रभागा ओबीसी महिलांना आरक्षित झाल्यामुळे त्यांचं महापालिकेत लोकप्रतिनिधी होण्याचं स्वप्न दूर राहिलं. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीतील वॉर्ड आरक्षणाची लॉटरी जाहीर झाली आहे. माझ्या वॉर्ड क्रमांक १ मधील जागा



ओबीसी (इतर मागासवर्गीय) प्रवर्गासाठी राखीव करण्यात आली आहे. मी ओबीसी प्रवर्गातील नसल्यामुळे मी ही निवडणूक लढवू शकणार नाही. हा निर्णय खरोखरच निराशाजनक आहे - मी निवडणूक लढवू शकणार नाही यामुळे मी असं म्हणत नाही, तर मी माझ्या वॉर्डातील आणि दहिसर विधानसभा मतदारसंघातील जनतेची लोकप्रतिनिधी म्हणून सेवा करणे सुरु ठेवू शकणार नाही, असा याचा अर्थ होत आहे.हा निर्णय माझ्या सार्वजनिक सेवेच्या प्रवासात अडथळा आणणार नाही. अभिषेकच्या अकाली निधनापासून मला घोसाळकर कुटुंबाकडूनच नव्हे तर माझ्या वॉर्ड, दहिसर आणि बोरिवलीतील प्रत्येक रहिवाशांकडून अपार प्रेम, विश्वास आणि पाठिंबा मिळाला आहे.

## एकनाथ शिंदे विरुध्द उध्दव ठाकरे, सुप्रीम कोर्टात काय-काय घडलं?

**नवी दिल्ली :** शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यावर पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्हाच्या वादावरील अंतिम सुनावणी आता पुढच्याच वर्षी होणार आहे. या प्रकरणात २१ जानेवारी २०२६ रोजी पुढील सुनावणी घेतली जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी स्पष्ट केले. त्याबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेसमधील अशाच मुद्यावरील सुनावणीही घेतली जाईल. ही सुनावणी दुसऱ्या दिवशीही (२२ जानेवारी) चालू राहील असे न्या. सूर्यकांत यांनी तोंडी सांगितले.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी याबाबत सुनावणी घ्यावी अशी उबाठा पक्षाने मागणी केली होती. मात्र ती मान्य झाली नाही.एकनाथ शिंदे गटाला अधिकृत शिवसेना म्हणून मान्यता देण्याच्या आणि त्यांना 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्ह बहाल करण्याच्या




निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका उबाठा पक्षाने दाखल केली आहे. गेली ३ वर्षे त्यावर सुनावणी सुरू आहे. त्याची सुनावणी न्यायमूर्ती सूर्यकांत आणि जयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर झाली.

शिवसेनेच्या प्रकरणाबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेसम धील अजित पवार गटाला पक्षाचे अधिकृत निवडणूक चिन्ह देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरुद्ध शरद पवार गटाने दाखल केलेल्या याचिकेवरही पुढील सुनावणीत विचार करण्यासही खंडपीठाने सहमती दर्शविली.या दोन्ही प्रकरणांमधील कायदेशीर मुद्दे समान आणि एकमेकांवर अवलंबून असल्याचे निरीक्षण नोंदवून न्यायालयाने प्रकरणांची एकत्रित सुनावणी घेण्यास सहमती दर्शविली. २१ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता या प्रकरणाची सुनावणी घेण्यात येईल, असे खंडपीठाने सांगितले. गरज पडल्यास सुनावणी दुसऱ्या दिवशीही सुरू राहू शकेल. यासाठी २२ जानेवारी रोजीही कोणतेही महत्त्वाचे प्रकरण पोस्ट करू नये, असे आदेश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी न्यायालयाच्या प्रमुखांना दिले.आजच्या काही मिनिटांच्या सुनावणीत उबाठा पक्षाकडून अभिषेक मनु सिंघवी आणि देवदत्त कामत यांनी तर शिवसेनेच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी आणि एन के कौल यांनी हजेरी लावली. उबाठा पक्षाच्या याचिकेत निवडणूक आयोगाच्या फ ेब्रुवारी २०२३ च्या त्या आदेशाला आव्हान देण्यात आले आहे, ज्यात २०२२ मध्ये शिवसेनेत फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव आणि चिन्ह शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला बहाल केले होते.

सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात नोटीस बजावताना उबाठा पक्षाला 'शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)' हे नाव आणि 'ज्वलंत मशाल' हे चिन्ह कायम ठेवण्याची परवानगी दिली होती. त्याचप्रमाणे न्यायालयाने शरद पवार गटाला 'तुतारी फुंकणारा माणूस' हे चिन्ह वापरण्याची परवानगी देणारी अंतरिम व्यवस्था केली होती आणि अजित पवार गटाला घड्याळ चिन्हाचा वापर करताना, हे न्यायप्रविष्ट प्रकरण आहे हे ठळकपणे प्रसिद्ध करण्यास सांगितले होते.

# रात्री प्रियकराला बोलावलं... पत्नीचे अनैतिक संबंध, पतीला संपवण्यासाठी सर्व मर्यादा पार

**लखनऊ :** उत्तर प्रदेशच्या बरेली शहरात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. इथे एका डोळ्यांच्या डॉक्टरचा पत्नी आणि तिच्या प्रियकराने मिळून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात आरोपी महिलेचं वय ५७ आहे. तर तिच्या प्रियकराचं वय ४५ असल्याची माहिती आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी महिलेच्या प्रियकराला बेड्या ठोकल्या आहेत. त्याला पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर तो भळाभळा बोलू लागला. त्याने आपला गुन्हा कबूल केला आहे. तसेच या प्रकरणात त्याची प्रेयसी म्हणजेच डॉक्टरच्या पत्नीची जास्त चूक असल्याचा दावा आरोपीने केला आहे. संबंधित महिला ही फरार झाली आहे. तिचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे.बरेलीच्या सुभाषनगर येथील





एक नेत्र चिकित्सक डॉक्टर हे पूर्वी आरोग्य विभागात कार्यरत होते. ते सध्या सेवानिवृत्त झाले आहेत. या डॉक्टरसोबत २८ ऑक्टोबरच्या रात्री जीवघेणा प्रकार घडला. त्या दिवशी रात्री डॉक्टरची हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण सुदैवाने डॉक्टर घरातून बाहेर पडण्यात यशस्वी ठरले. डॉक्टर घरातून बाहेर पडले तेव्हा त्यांचे दोन्ही हात बांधलेले होते. त्यांनी घराबाहेर पडताच शेजाऱ्यांची मदत घेतली. त्यामुळे त्यांचा जीव वाचला.या घटनेनंतर त्यांनी तातडीने पोलिसांना घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. पण तोपर्यंत उशिर झाला होता. डॉक्टरची पत्नी शिखा सक्सेना आणि तिचा प्रियकर सौरभ सक्सेना हे पळून गेले होते. पण पोलिसांना डॉक्टरच्या घरात दोरी, टेप आणि इतर साहित्य मिळालं. पोलिसांनी ते साहित्य जप्त केले. तसेच पोलिसांनी घटनेची माहिती घेत आरोपींचा शोध सुरु केला.

या घटनेनंतर आरोपी पत्नी शिखा ही आपल्या मुलगी आणि जावईच्या घरी पळून गेली होती. पण पोलिसांना ज्यावेळी याबाबत माहिती मिळाली तोपर्यंत उशिर झाला होता. कारण तिथून सुद्धा आरोपी महिला पळून गेली होती. तर तिच्या प्रियकराला शोधून काढण्यात पोलिसांना यश आलं. तिच्या प्रियकराने आपला गुन्हा कबूल केला आहे. तसेच आपल्या पेक्षा डॉक्टरची पत्नीच जास्त दोषीअसल्याचा दावा त्याने केला आहे.खरंतर डॉक्टरला आमच्या प्रेम संबंधांबद्दल आधीपासून माहिती होती. पण सेवानिवृत्त झाल्यापासून डॉक्टर जास्त वेळ घरी राहायला लागले होते. तसेच डॉक्टरच्या वागणुकीवर त्याची पत्नी नाराज होती. डॉक्टरने पत्नीला पैसे देणे बंद केलं होतं‘, असं आरोपी प्रियकराने सांगितलं. दुसरीकडे डॉक्टरच्या पत्नीकडून पैसे आणि दागिने घेऊनच आपला खर्च भागायचा अशी कबुली देखील आरोपीनेदिली आहे.

पतीकडून पैसे मिळत नाहीत म्हणून पत्नीने त्याला जीवे मारण्याची योजना आखली. तिने आधी डॉक्टरला दुधात गुंगीचं औषध मिळवलं. त्यामुळे डॉक्टर बेशुद्ध झाला. त्यानंतर तिने आपल्याला बोलावलं. डॉक्टर जास्त नशेत असल्यामुळे आपण त्याची हत्या करु शकलो नाही, असा कबुली जबाब आरोपीने दिला आहे. आता या प्रकरणात आरोपी शिखा कधी पकडली जाते? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## नेत्याला बर्थडेच्या दिवशीच संपवल

**सांगली :** वाढदिवसाच्या दिवशीच मुळशी पॅटर्न स्टाईलने उत्तम मोहिते यांचा निर्घृण खून करण्यात आलाय आणि खुनाच्यावेळी नेमका काय प्रकार घडला? कशा पद्धतीने हल्लेखोरांनी उत्तम मोहिते यांच्यावर हल्ला चढवला या सर्व घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ आता समोर आला आहे. अत्यंत धक्कादायक आणि काळजाचा थरकाप उडवणारी ही घटना आहे. या घटनेमध्ये उत्तम मोहितेंवर हल्ला करणाऱ्यांपैकी एका हल्लेखोराचा देखील मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या डबल मर्डरच्या घटनेनं सांगली हादरुन गेली आहे.सांगली शहर आज मध्यरात्रीच्या सुमारास मुळशी पॅटर्न खुनाच्या घटनेनं हादरले. राजकीय पदाधिकारी असलेल्या उत्तम जिनाप्पा मोहिते (वय ४१ रा. गारपीर चौक, सांगली) यांचा त्यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी असलेल्या स्टेजजवळ धारदार हत्याराने त्यांच्यावर सपासप वार केला. ते जीव वाचवत एका त्यांच्या घरात शिरले. हल्लेखोरांनी त्यांचा तिथे निर्घृण खून केला. मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास सदर खुनाची घटना घडली. दरम्यान, हल्ला करणाऱ्या संशयित रेकॉर्डवरील गुन्हेगार शाहरुख शेख याला संतप्त जमावाने बेदम





चोप दिला. यात तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.याबाबत अधिक माहिती अशी की, मृत उत्तम मोहिते हे राजकीय पदाधिकारी असून दलीत महासंघ मोहिते गटाचा संस्थापक अध्यक्ष आहे. त्यांनी सांगली जिल्ह्यातअनेक विषयांवर आंदोलन केले होते. हटके आंदोलन करण्यासाठी मोहिते हे प्रसिद्ध होते. उत्तम मोहिते यांचा आज मंगळवारी वाढदिवस होता. यासाठी त्यांच्या गारपीर चौक येथील घरासमोर स्टेज घालून जंगी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रात्री दहा वाजण्याच्या सुमारास संशयित शेख हा त्याच्या साथीदारांसह याठिकाणी आला. जेवणाचा आस्वाद घेतला. यानंतर मोहिते यांना शुभेच्छा देण्याच्या बहाण्याने टोळके गेले आणि त्यांच्याजवळ असलेल्या धारदार हत्याराने पोटात आणि मानेवर वार केले.

## कोल्हापुरात चुटकीवाला बाबामुळे खळबळ

**कोल्हापूर :** कोल्हापूरच्या टिंबर मार्केट परिसरातील 'चुटकीवाला बाबा' नावाच्या तथाकथित बाबाचे व्हिडिओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल होऊ लागले लागले आहेत. त्यातील अघोरी प्रयोगांमुळे नागरिकांमध्ये संताप उसळला आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या बाबाविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केल्यानंतर पोलीस यंत्रणा देखील या बाबाचा ठावठिकाणा शोधून काढण्याच्या कामाला लागली आहे.चुटकीवाला बाबा'चे सहा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले आहेत. एका व्हिडिओत तो जमिनीवर बसलेल्या व्यक्तीच्या कपाळावर हात ठेवून काही मंत्रोच्चार करताना दिसतो; दुसऱ्यात मानवी कवटीचा आधार घेत काही विधी करत असल्याची दृश्ये आहेत. तिसऱ्या आणि चौथ्या व्हिडिओत तो स्त्रिया आणि तरुणींवर चिमट्यासारख्या साधनाने स्पर्श करत अघोरी तंत्रविधी करतो आहे. एका दृश्यात त्रिशूल हातात घेऊन काही जप करताना दिसतो. तसेच या व्हिडिओंनी कोल्हापुरात आणि परिसरात खळबळ उडाली आहे.

## पुण्यात टोळक्यांनी सीसीटीव्ही फोडले

**पुणे :** पुण्यातली गुन्हेगारी सध्या नागरिकांसाठी नाहक त्रास देणारी ठरत आहे. आता पुण्यातले गुंड टोळक्याने मुक्त संचार करत आहेत. ते कायदा मानायला तयार नाहीत. त्यांनी कोणालाही न जुमानता बिनधास्तपणे सीसीटीव्ही कॅमेरे फोडले आहेत. याशिवाय हे गुन्हेगार आता हातात मोठमोठे शस्त्रे घेऊन परिसरातून रात्री उशिरा उनाडक्या करताना दिसत आहेत. पण या सगळ्याप्रकारामुळे नागरिक मात्र दहशतीच्या छायेखाली जगताना दिसत आहेत, कारण भरदिवसा खून करणे असो किंवा दिवसाढवळ्या जीवघेणे हल्ले होणे असो, मागच्या काही दिवसांतील घटना पाहता पुण्यामध्ये हे चित्र आता सर्वसाधारण झाले आहे, असे म्हणायची वेळ येऊन ठेपली आहे. दरम्यान, पुण्यात वाढती गुन्हेगारी, टोळी युद्ध आणि अल्पवयीन मुलांच्या वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणण्यासाठी कोथरूडमधील केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काही दिवसांपूर्वी पोलीस आयुक्तांसोबत बैठक घेतली होती. परंतु, त्या बैठकीला आठवडा उलटत नाही तोच कोथरूडमध्ये पुन्हा टोळक्यांनी दहशत माजवल्याची घटना समोर आली आहे.सुतारदरा परिसरातील गणेश कॉलनी भागात काही टवाळखोर युवकांनी हातात धारदार कोयते घेत, तोंडावर मास्क लावून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे फोडल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये आठ ते दहा युवक एकत्र फिरत असून, परिसरातील कॅमेरे मुद्दाम फोडताना दिसत आहेत. हातात मोठी शस्त्रे घेऊन हे युवक मुक्तपणे फिरत असल्याने परिसरातील रहिवाशांमध्ये सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

काही दिवसांपूर्वी वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी खासदार मुरलीधर मोहोळ आणि आमदार चंद्रकांत पाटील यांनी पोलीस आयुक्तांची भेट घेतली होती. मात्र, ही बैठक निष्फळ ठरल्याचे आता या घटनेवरून दिसत आहे.

या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी पोलिसांकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. पोलिसांनी संबंधित टोळक्यांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील रहिवासी करत आहेत.

## रेल्वेत पाणी विकत होता, क्षुल्लक वाद अनब प्रवाशाने गर्दीसमोरच संपवलं

**नांदेड :** किरकोळ वादातून एका २९ वर्षीय पाणी विक्रेत्याचा पोटात चाकू भोसकून निर्घृणपणे खून करण्यात आला आहे. अकोला येथून सिकंदराबादकडे जाणाऱ्या इंटरसिटी एक्सप्रेसमध्ये उमरी - धर्माबाद दरम्यान ही घटना घडली. रेल्वे पोलिसांनी आरोपीला तेलंगणातील निजामाबाद जिल्ह्यातील आरमुर येथून ताब्यात घेतले आहे. आतिश अशोक हैबते अस मयताच नाव आहे. या घटनेने खळबळ उडाली असून रेल्वेमधील सुरक्षा ऐरणीवर आली आहे.

उमरी शहरातील रापतवारनगर भागातील आतिश अशोक हैबते हा रेल्वेत पाणी बॉटल विक्रीचा व्यवसाय करायचा. नेहमी प्रमाणे सोमवारी तो अकोला ते सिकंदराबाद धावणाऱ्या इंटरसिटी एक्सप्रेस रेल्वेत पाणी विक्री करण्यासाठी उमरीतून चढला. यावेळी पाणी विक्रीच्या कारणावरून त्याचा एका प्रवाशासोबत वाद झाला. किरकोळ वादाचे रूपांतर खुनात झाले.आरोपीने अशोक याच्या पोटात चाकू भोसकून त्याचा खून केला. रक्तबंबाळ अवस्थेत अशोक रेल्वेतच कोसळला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. खंजीर




भोसकून खून करताना रेल्वे डब्यातील अनेक प्रवाशांनी बघ्याची भूमिका घेतली. मात्र एका महिलेने आपल्या मोबाईलवर थरारक घटनेचे चित्रीकरण केले. प्रवाशी महिलेने आरोपीला पकडण्यासाठी आरडाओरड केली, परंतू कुणीच समोर आले नाही.

घटनेची माहिती निजामाबाद रेल्वे पोलिसांना कळविण्यात आल्यावर रेल्वेतून मृतदेह उतरून घेण्यात आला. ही घटना नांदेड रेल्वे पोलिसांच्या हद्दीत येत असल्याने नांदेड रेल्वे पोलीस निरीक्षक वाघमारे यांना घटनेची माहिती कळताच त्यांनी पुढील तपास सुरू केला. फरार आरोपी हा तेलंगणा आणि आंध्रप्रदेश राज्यातून रेल्वेने उमरी शहरात अवैध मार्गाने तांदूळ आणण्याचा व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.जुन्या किरकोळ वादातून खून करण्यात आला असावा असा अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

मात्र याबाबतचे खरे कारण अद्याप समजू शकलेले नाही. या प्रकरणातील आरोपीला रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असल्याचं सांगण्यात आलं आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# इस्लामाबादमधील आत्मघातकी हल्ल्यानंतर श्रीलंकन संघाच्या सुरक्षेत वाढ!

**मुंबई :** पाकिस्तानमध्ये अलिकडेच दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यानंतर, श्रीलंका क्रिकेट संघाच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पाकिस्तान क्रिकेट बोर्डचे अध्यक्ष आणि नक्वी हे पाकिस्तानचे गृहमंत्री असलेले मोहसीन नक्वी यांनी श्रीलंकेच्या संघाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि त्यांना पूर्ण सुरक्षेचे आश्वासन दिले आहे. पाकिस्तानकडून पुन्हा एकदा अप्रत्यक्षपणे अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारवर पाकिस्तानमध्ये दहशतवादी हल्ले करण्यासाठी तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) ला त्यांच्या भूमीचा वापर करण्याची मुभा दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मंगळवारी, इस्लामाबादमधील न्यायालयीन संकुलाबाहेर एका आत्मघातकी हल्लेखोराकडून स्वतःला उडवून देण्यात आले. ज्यामध्ये १२ जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले आहेत. दरम्यान, उत्तर पाकिस्तानच्या वाना भागातील वाना कॅडेट कॉलेजवर झालेला दहशतवादी हल्ला सुरक्षा दलांनी उधळून लावला आणि सुमारे ३०० विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बाहेर



काढण्यात यश आले. पाकिस्तानचे माहिती मंत्री अता तरार यांनी सांगितले की, जर सुरक्षा दलांनी तातडीने कारवाई केली नसती तर पाकिस्तानमध्ये २०१८ मध्ये पेशावर शाळेतील हल्ल्यासारखी मोठी घटना घडू शकली असती.

तीन वर्षांपूर्वी न्यूझीलंड संघाकडून पाकिस्तानविरुद्धची मर्यादित षटकांची मालिका रद्द करण्यात आली होती. संभाव्य दहशतवादी हल्ल्याची विश्वसनीय माहिती मिळाल्यानंतर न्यूझीलंड संघ कोणताही सामना न खेळता मायदेशी परतला होता. यामुळेच मोहसिन नकवी यांनी वैयक्तिकरित्या स्टेडियमला भेट दिली आणि पाहुण्या संघाच्या सदस्यांची भेट घेऊन त्यांना त्यांच्या सुरक्षेची खात्री दिली असे सूत्रांनी सांगितले की मार्च २००९ मध्ये, टीटीपीच्या दहशतवाद्यांकडून गद्दाफी स्टेडियमजवळ श्रीलंकेच्या संघाच्या बसवर हल्ला करण्यात आला होता, ज्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव परदेशी संघांनी देशाचा दौरा करण्यास नकार दिल्याने पाकिस्तानमधील आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने जवळजवळ १० वर्षे थांबलेले होते.

सूत्राने सांगितले की, ङ्गश्रीलंकेच्या संघाची सुरक्षा वाढवली गेली आहे आणि पाहुण्या खेळाडू आणि अधिकाऱ्यांच्या सुरक्षेवर विशेष लक्ष ठेवण्यासाठी पाकिस्तानी सैन्य आणि निमलष्करी रेंजर्स देखील तैनात करण्यात आले आहेत.ङ्ग रावळपिंडीमध्ये तीन एकदिवसीय सामने खेळल्यानंतर, श्रीलंका १७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या टी-२० तिरंगी मालिकेत सहभागी होणार आहे. ज्यामध्ये झिम्बाब्वे तिसरा संघ असणार आहे.

## WTC साठी दक्षिण आफ्रिकेविरुद्धची कसोटी मालिका ठरणार महत्त्वाची

**मुंबई :** भारत आणि दक्षिण आफ्रिका संघ शुक्रवारपासून दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी आमनेसामने येणार आहेत. १४ नोव्हेंबर रोजी कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर पहिला कसोटी सामना खेळला जाणार आहे. या कसोटी मालिकेसाठी भारतीय कसोटी संघ सज्ज झाला असून भारतीय खेळाडू कसून सराव करत आहेत. अशातच भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत गतविजेत्या जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) विजेत्या दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दमदार कामगिरीचा विश्वास आहे.

भारत सध्या जागतिक कसोटी अजिंक्यपद संघाच्या गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे. भारताने इंग्लंडमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत आणली आणि त्यानंतर डब्ल्यूटीसी सायकलच्या सुरुवातीला घरच्या मैदानावर वेस्ट इंडिजला दोन कसोटी सामन्यांमध्ये हरवले. दुसरीकडे, दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी मालिकेत १-१ अशी बरोबरी साधून त्यांच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद मोहिमेची म्हणाला, विजेतेपदाच्या बचाव सुरुवात केली. सिराज नवीन वर्ल्ड कप सायकलसाठी ही मालिका महत्त्वाची आहे, विशेषतः कारण दक्षिण आफ्रिका गतविजेता आहे. जरी त्यांनी पाकिस्तानविरुद्ध मालिका १-१ अशी बरोबरीत सोडवली असली तरी, आम्हाला आमच्या चांगल्या फॉर्मवर विश्वास आहे.

आम्ही सकारात्मक वातावरण निर्माण केले आहे. आम्ही इंग्लंडमध्ये चांगली



कामगिरी केली आणि वेस्ट इंडिजविरुद्ध विजय मिळवला. इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत मोहम्मद सिराजने २३ बळींसह सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज म्हणून कामगिरी केली. त्याने वेस्ट इंडिजविरुद्ध आपला प्रभावी फॉर्म सुरू ठेवला, दोन सामन्यांमध्ये १० बळी घेतले. मी चांगल्या लयीत गोलंदाजी करत आहे आणि त्याचा जास्तीत जास्त फायदा घेण्याचा प्रयत्न करत आहे. मजबूत संघांना तोंड दिल्याने सुधारणा आवश्यक असलेल्या क्षेत्रांची ओळख पटण्यास मदत होते आणि मी या आव्हानाची खरोखर वाट पाहत आहे.

## सम्राट राणा १० मीटर एअर पिस्तूलमध्ये विश्वविजेता

**नवी दिल्ली :** युवा भारतीय नेमबाज सम्राट राणाने येथील प्रतिष्ठित आयएसएसएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूलमध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. २० वर्षीय सम्राट हा ऑलिंपिकमध्ये समाविष्ट असलेल्या प्रकारात विश्वविजेता होणारा पहिला भारतीय पिस्तूल नेमबाज ठरला आणि यादरम्यान भारताला या स्पर्धेत सांघिक सुवर्णपदक जिंकण्यासही त्याने मदत केली. तीन सुवर्ण, तीन रौप्य आणि तितक्याच कांस्यपदकांसह भारताने पाचव्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. चीनने सहा सुवर्ण, चार रौप्य आणि दोन कांस्यपदकांसह आघाडी घेतली आहे.


करनालचा रहिवासी असलेल्या सम्राटने अंतिम फेरीत २४३.७ गुणांची शानदार कामगिरी करत चीनच्या हू काईच्या आव्हानाला मागे टाकले, ज्याने २४३.३ गुणांसह पदक जिंकले. भारताचा वरुण तोमर, जो उत्तर प्रदेशातील बागपत



जिल्ह्यातील एका लहान गावातून येतो आणि ऑलिंपियन पिस्तूल स्टार सौरभ चौधरीचा चुलत भाऊ आहे, त्याने २२१.७ गुणांसह चुरशीच्या अंतिम फेरीत कांस्यपदक जिंकले. या अंतिम फेरीत तीन नेमबाजांमध्ये अनेक वेळा आघाडी बदलली. तथापि, सम्राट मूलभूत गोष्टींवर टिकून राहिला आणि एकदाही डगमगला नाही. त्याने या ठिकाणी मिळविलेले कनिष्ठ स्तरावरील यश वरिष्ठ स्तरावर देखील कायम ठेवले. त्याने याच ठिकाणी २०२२ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कनिष्ठ एअर पिस्तूल संघातून आणि कनिष्ठ मिश्र संघातून दोन सुवर्णपदकांची कमाई केली होती. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत एकाच स्पर्धेत दोन भारतीय नेमबाजांनी पदके जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. भारताने सम्राट (५८६), वरुण (५८६) आणि श्रवण (५८२) या त्रिकुटाने मिळून मिळविलेल्या १७५४ गुणांसह सांघिक सुवर्णपदक जिंकले. इटली दुसऱ्या स्थानावर राहिली, तर जर्मनीने कांस्यपदक जिंकले. दुहेरी ऑलिंपिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर आणि आशियाई क्रीडास्पर्धांमध्ये पदके जिंकलेली ईशा सिंग यांना महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलच्या अंतिम फेरीत निराशा सहन करावी लागली. देशाच्या या अव्वल दोन नेमबाजांना पदक जिंकता आले नाही. मात्र भारताला सांघिक रौप्यपदक जिंकल्याने एक छोटासा दिलासा मिळाला. ईशा (५८३), मनू (५८०) आणि जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेली सुरुची इंदर सिंग (५७७) यांनी १७४० गुणांसह दुसरे स्थान पटकावले.

## हे निर्लज्ज लोक फक्त तुमचा वापर करतील..

**मुंबई :** टीम इंडियाच्या महिला क्रिकेट संघाच्या एकदिवसीय विश्वचषक विजयाने देशभरात आनंदाचे वातावरण आहे. अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला हरवल्यानंतर म हिला संघाच्या वाढत्या लोकप्रियतेचे सगळीकडून कौतुक होत आहे. सरकारपासून ते अगदी म ोठ मोठ्या ब्रँडपर्यंत सर्वांनी या रणरागिणींचे कौतुक केले आहे. दरम्यान, हिंदुस्थानचे माजी क्रिकेटपटू सुनिल गावसकर यांनी हरम नप्रीत कौर आणि संपूर्ण टीमला सावधगिरीचा इशारा दिला आहे. जर काही रोख रक्कम, बक्षिसे किंवा कोणत्याही प्रकारचा करार त्यांच्यापर्यंत पोहोचला नाही तर निराश होऊ नका, असे आवाहन केले आहे.



विश्वचषक जिंकल्यापासून अभूतपूर्व बक्षिसे जाहीर करण्यात आली आहे. हिंदुस्थानी क्रिकेट नियामक मंडळाने ५१कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे, त्याव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद कडून संघाला ४० कोटी रुपयांचे बक्षीस देखील देण्यात आले आहे. तसेच अनेक राज्य सरकारांनी रिचा घोष, हरमनप्रीत कौर, स्मृती मानधना, हरलीन देओल इत्यादी खेळाडूंना रोख बक्षिसे देण्याचे आश्वासन दिले आहे.

सावधगिरीचा एक शब्द मुलींसाठी आहे. जर कोणी वचन दिलेले आणि काही बक्षिसे तुमच्यापर्यंत पोहोचली नाहीत तर कृपया निराश होऊ नका. हिंदुस्थानात, जाहिरातदार, ब्रँड आणि व्यक्ती विजेत्यांचा आधार घेऊन स्वतः ची मोफत प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करतात. संघाचे अभिनंदन करणाऱ्या जाहिराती आणि होर्डिंगवर एक नजर टाका. तोपर्यंत ते संघ आणि वैयक्तिक खेळाडूंसाठी स्पॉन्सर करतील. कारण इतर लोक फक्त त्यांच्या ब्रँडचा किंवा स्वतःचा प्रचार करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे गावसकर यांनी सांगितले आहे.

# गोविंदा अचानक बेशुद्ध कसा झाला? सांगितलं कारण

**मुंबई : बॉलिवूड अभिनेता गोविंदा यांची हेल्थ अपडेट समोर आली आहे. मंगळवारी (११ नोव्हेंबर) रात्री ८ वाजता गोविंदाची प्रकृती अचानक बिघडली. त्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्याला औषधे देण्यात आली आणि पहाटे १ च्या सुमारास त्यांना मुंबईतील जुहू परिसरातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गोविंदा अचानक बेशुद्ध पडल्यावर त्यांना रुग्णालयात नेण्यात आले.**

६१ वर्षीय अभिनेता गोविंदा यांना बुधवारी मुंबईतील क्रिटीकेअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. आता मात्र गोविंदा यांची प्रकृती स्थिर झाली असून त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. डिस्चार्ज दिल्यानंतर गोविंदा यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'मी आता ठीक आहे. मी खूप थकलो होतो कारण मी खूप व्यायाम केला होता. योग आणि प्राणायाम आरोग्यासाठी सर्वोत्तम आहेत. जास्त व्यायाम शरीरावर ताण आणू शकतो. कठीण व्यायामापेक्षा योग करणे चांगले. मी स्वतःला आणखी हेल्दी ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. डॉक्टरांनी मला औषधे लिहून दिली आहेत आणि सध्या विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे.'

रात्री गोविंदा घरी एकटे असल्यामुळे त्यांनी ललित बिंदल यांना फोन केला. मग डॉक्टरांशी संपर्क साधून गोविंदा यांना रुग्णालयात आणण्यात आले. त्यानंतर गोविंदा यांच्या वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या. सकाळी त्यांची तब्येत सुधारली. म्हणून त्यांना जनरल वॉर्डमध्ये शिफ्ट करण्यात आले. गोविंदाची प्रकृती स्थिर असल्यामुळे त्यांना डिस्चार्ज देण्यात आला.

> गोविंदाचे मित्र आणि कायदेशीर सल्लागार ललित बिंदल यांनी दिलेल्या माहितीनुसार, गोविंदा यांना मंगळवारी सकाळपासून अशक्त आणि अस्वस्थ वाटत होते. अचानक संध्याकाळी त्यांना चक्कर आली आणि ते बेशुद्ध पडले. त्यानंतर फॅमिली डॉक्टरांनी त्यांना औषध घेतली आणि विश्रांती करायला सांगितले. त्यानंतर पुन्हा १२.०० च्या सुमारास त्यांना पुन्हा अस्वस्थ वाटू लागले. अशक्तपणा जाणवला. चक्कर आल्यासारखे झाले.



# लग्नाची एक्सपायरी डेट, काजोलचे लग्नाबद्दल विधान

**मुंबई :** अभिनेत्री काजोल सध्या तिच्या टू मच विथ काजोल अँड ट्विंकल या टॉक शोमुळे चर्चेत आहे. शोच्या नवीन भागात अभिनेता विकी कौशल आणि अभिनेत्री कृती सेनन दिसणार आहेत. दरम्यान, शोचे काही प्रोमो समोर आले आहेत, ज्यामध्ये काजोल आणि ट्विंकल त्यांच्या पाहुण्यांसोबत खूप मजा करताना दिसत आहेत. नुकत्याच झालेल्या एका एपिसोडमध्ये ट्विंकलने लग्न झाल्यावर एकमेकांची फसवणूक, यावर तिचं मत मांडलं होतं. आता ट्विंकलनंतर काजोलनेही लग्नाबद्दल तिचं मत मांडलं आहे. त्यामुळे सोशल मीडियावर चर्चांना उधाण आले आहे.




खरंतर, शोच्या ये या वो सेगमेंट दरम्यान, प्रश्न विचारण्यात आला होता, 'लग्नाला एक्सपायरी डेट असावी का? कृती सेनन, विकी कौशल आणि ट्विंकल खन्ना यांनी या प्रश्नाशी असहमती दर्शवली. त्यांनी रेड झोन निवडला. यावर ट्विंकल खन्नाने लगेच प्रतिक्रिया दिली, नाही, लग्न म्हणजे काय वॉशिंग मशीन नाही एक्सपायरी डेट असायला मात्र, काजोलने यावर स्पष्टपणे आपले मत व्यक्त केले.

तिच्या निर्णयाबद्दल विचार करताना काजोल म्हणाली, मलाही तसेच वाटते. योग्य वेळी योग्य व्यक्तीशी लग्न करण्याची हमी काय आहे? लग्न नूतनीकरण हा एक चांगला पर्याय असेल आणि जर लग्नाची मुदत संपली तर कोणालाही जास्त काळ काळजी करण्याची गरज नाही.काजोलने ट्विंकलला ग्रीन झोनमध्ये सामील होण्यासाठी मनवण्याचा प्रयत्नही केला, पण ट्विंकल ठाम राहिली.

पैशाने आनंद खरेदी करता येतो का? यावेळी, ट्विंकल खन्ना आणि विकी कौशल सहमत असल्याचे दिसून आले आणि त्यांनी ग्रीन झोन निवडला. काजोलने या विधानाशी असहमती दर्शविली. काजोल म्हणाली की तुमच्याकडे कितीही पैसे असले तरी ते प्रत्यक्षात अडथळा बनू शकते. ते तुम्हाला खऱ्या आनंदापासून दूर ठेवते. काही विचार केल्यानंतर, कृती सहमत झाली की पैशाने आनंद खरेदी करता येतो, किमान काही प्रमाणात तरी.

# भट्ट कुटुंबाचे वाद चव्हाट्यावर?

**मुंबई :** अलिकडेच दिलेल्या मुलाखतीत मुकेश भट्ट यांनी घरगुती गोष्टी चव्हाट्यावर आणल्या. त्यांनी त्यांच्या कौटुंबिक नातेसंबंधांबद्दल आणि वैयक्तिक आयुष्याबद्दल खुलासा केला. एकेकाळी आशिकी, सडक, मर्डर आणि राज यासारख्या बॉलिवूडमधील सर्वात मोठ्या हिट चित्रपटांची निर्मिती करणारे भट्ट बंधू २०२१ मध्ये एका वादामुळे व्यावसायिकदृष्ट्या वेगळे झाले. तेव्हापासून, मुकेश फारसे कुठे नसतात, परंतु अलिकडच्या एका मुलाखतीत त्यांनी या वादाचा त्यांच्यावर भावनिकरित्या कसा परिणाम झाला याबद्दल सांगितले. मुलाखतीत मुकेश भट्ट यांनी खुलासा केला की त्यांना पुतणी आलिया भट्ट आणि रणबीर कपूरच्या लग्नाला आमंत्रित करण्यात आले नव्हते. 'मी दुखावलो गेलो नाही असे म्हटले तर मी ढोंगी ठरेन. त्यामुळे अर्थात मी दुखावलो होतो. मी आलियावर खूप प्रेम करतो, फक्त तिच्यावरच नाही तर शाहीनवरही करतो. म्हणून जेव्हा तिचे लग्न झाले तेव्हा मला वाटले की ते माझ्या मुलीचे लग्न आहे. मला नक्कीच तिथे जायचे होते पण मला बोलावले नाही.



# भारती सिंगच्या पतीनं भेट दिलं २० लाखाचं घड्याळ



**मुंबई :** कॉमेडी क्वीन भारती सिंग सध्या दुसऱ्यांदा गरोदर आहे. नुकतेच्या भारतीच्या पतीने हर्ष लिंबाचियाने तिला एक अतिशय खास गिफ्ट दिले. हे गिफ्ट घड्याळ असून हे साधे सुधे घड्याळ नसून, तब्बल २० लाखांचे घड्याळ आहे. ईश्वरीळ डशीशिपींळ ढीलेसरी या ब्रँडचे हे घड्याळ असून, याची किंमत अदमासे २० लाख आहे.

हर्षची भेट पाहून भारती भावुक झाली. तिने तिच्या YouTube व्लॉगवर घड्याळ दाखवून तिचा आनंद व्यक्त केला आणि प्रियंका चोप्राच्या हातात पहिल्यांदा भारतीने हे घड्याळ पाहिले होते. हे घड्याळ पाहताक्षणी भारतीला खूप आवडले होते. म्हणून व्लॉगमध्ये भारतीने प्रियंकाला म्हटले की, प्रियंका चोप्रा, मीही हे घड्याळ विकत घेतले : ऐकतेस का? हा भारतीचा व्हिडिओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाला आणि प्रियंका चोप्राने स्वतः तो पाहिला. ईश्वरीळची जागतिक ब्रँड ॲम्बेसेडर असलेल्या प्रियंकाने भारतीच्या पोस्टवर कमेंट करत लिहिले, मी पाहिलं, हे घड्याळ माझ्यापेक्षाही तुझ्यावर चांगले दिसते. तू पुढची Bvlgari ब्रँड ॲम्बेसेडर आहेस! तुला आणि तुझ्या कुटुंबाला खूप खूप प्रेम.

# गौरव की शाहबाज नवा कॅप्टन कोण? संपूर्ण घर नॉमिनेट

**मुंबई :** 'बिग बॉस १९'मध्ये नुकताच कॅप्टन्सी टास्क पार पडला आहे. अलिकडेच अभिषेक बजाज आणि नीलम यांना घराबाहेर काढण्यात आले आहे. त्यानंतर मिड-वीक एविक्शनमध्ये मृदुल तिवारी घराबाहेर जातो. 'बिग बॉस १९'चा मास्टर माइंड गौरव खन्ना या आठवड्यात घराचा नवीन कॅप्टन बनतो. कॅप्टन्सी टास्क दरम्यान बिग बॉसमधील सदस्य या आठवड्यात बाहेर जाण्यासाठी नॉमिनेट झाले. कॅप्टन्सी टास्कमध्ये गौरव खन्ना आणि शाहबाज बदेशा यांना सर्वाधिक मते मिळाली. तेव्हा बिग बॉसने गौरवला कॅप्टन बनण्याचा पर्याय दिला. ज्याच्या बदल्यात संपूर्ण घराला नॉमिनेट केले जाईल आणि ३० टक्के राशन गमवावे लागेल, असे सांगितले गेले. तर शाहबाज कॅप्टन झाला असता तर १००% राशन मिळणार आणि कोणालाही नॉमिनेट केले जाणार नव्हते. त्यानंतर गौरव खन्ना 'बिग बॉस १९'चा नवा कॅप्टन बनला आणि त्याने संपूर्ण घराला नॉमिनेट केले. मात्र त्यानंतर बिग बॉसने गौरवला कॅप्टनशिपवरून काढून टाकले आहे. ज्यामुळे आता संपूर्ण घर नॉमिनेट झाले आहे. 'बिग बॉस १९'ची माहिती देणाऱ्या सोशल मिडिया पेजप्रमाणे या आठवड्यात बिग बॉसच्या घरातून अशनूर कौर आणि कुनिका सदानंद बाहेर जाऊ शकतात. अमाल, फराह आणि कुनिका म्हणाले की, 'बिग बॉसने युक्ती खेळली आणि त्यांनी हुशारीने गौरवला कॅप्टन बनवले.



# धर्मेंद्र रुग्णालयातून डिस्चार्ज, घरीच होणार उपचार

**मुंबई :** धर्मेंद्र यांच्या प्रकृतीबाबात मोठी अपडेट समोर आली आहे. धर्मेंद्र यांची प्रकृती आता उत्तम असून त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. धर्मेंद्र यांच्यावर आता घरीच उपचार करण्यात येणार आहे. पीटीआयने याबाबतचे वृत्त दिलेय. गेल्या काही दिवसांपासून धर्मेंद्र यांची प्रकृती खालावली होती, त्यामुळे त्यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू होते. व्हेंटिलेटरवर उपचार घेत असल्याने चाहत्यांमध्ये चिंतेचे वातावरण होत. दोन दिवसांपासून धर्मेंद्र यांच्या निधनाच्या बातम्यांची उलटसुलट चर्चा सुरू होती. पण त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती रुग्णालयाकडून देण्यात आली आहे. त्यांच्यावर घरीच उपचार करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून धर्मेंद्र यांची तब्येत बिघडली होती. त्यांना श्वास घेण्यास त्रास होत असल्यामुळे धर्मेंद्र यांना मुंबईतील प्रसिद्ध ब्रीच कँडी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.



८९ वर्षांचे दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांची प्रकृती आता सुधारत आहे.

***

# महिलांच्या आरोग्याच्या दिशेने बुलढाण्यात महत्वाचे पाऊल-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## एचपीव्ही लसीकरण मोहीम लवकरच सुरू १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींना मोफत लस

**जनसंचलन/बुलढाणा**

महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी राज्य शासनाने हाती घेतलेली ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस() लसीकरण मोहीम लवकरच बुलढाणा जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. मोहिमेंतर्गत १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींना मोफत लसीकरण केले जाणार असून हे महिलांच्या आरोग्याच्या दिशेने महत्वाचे आणि ऐतिहासिक पाऊल असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सांगितले.

एचपीव्ही लसीकरण मोहिमेबाबत नियोजन, समन्वय आणि जनजागृतीसाठीची महत्वाची बैठक नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस जागतिक आरोग्य संघटनेचे () राज्य वैद्यकीय अधिकारी डॉ. मुजीब सय्यद, तसेच आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास, अल्पसंख्याक व आयसीडीएस विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाबाबत ( ) चिंता व्यक्त करण्यात आली. बदलत्या जीवनशैली, असंतुलित आहार, तणाव आणि स्वच्छतेच्या अभावामुळे हा कर्करोग महिलांमध्ये झपाट्याने वाढत असून, सध्या देशातील महिलांमध्ये होणाऱ्या कर्करोगांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे, अशी माहिती तज्ज्ञांनी दिली. ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस () हा असा व्हायरस आहे जो महिलांमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण मानला जातो. हा संसर्ग लैंगिक संपर्काद्वारे होऊ शकतो. लसीकरण केल्यास शरीरात या विषाणूविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण होते आणि गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा धोका तब्बल ९९ टक्क्यांनी कमी होतो. खासगी रुग्णालयांमध्ये ८ ते १० हजार रुपयांपर्यंत किंमत असलेली ही लस आता शासनाच्या पुढाकारामुळे १४ ते १५ वर्षे वयोगटातील सर्व किशोरवयीन मुलींना मोफत देण्यात येणार आहे. यासाठी शाळांमार्फत सर्वेक्षण सुरू असून, प्रत्येक शाळेतील मुलींची माहिती संकलित केली जात आहे. या मोहिमेचा लाभ फक्त शहरी नव्हे, तर ग्रामीण भागातील नागरिकांनाही मिळावा यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व जिल्हा रुग्णालयांमध्ये लसी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आरोग्य विभागाने डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मोहीम औपचारिकपणे सुरू होईल, अशी माहिती जिल्हा




माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव यांनी दिली. एचपीव्ही लसीकरण ही फक्त लस नसून, महिलांच्या दीर्घकालीन आरोग्य संरक्षणाचे प्रभावी शस्त्र आहे. वेळेवर लसीकरण झाल्यास गर्भाशय मुखाच्या कर्करोगामुळे होणारे मृत्यू व शारीरिक त्रास मोठ्या प्रमाणात कमी करता येतील. अनेक वेळा या आजाराची लक्षणे सुरुवातीच्या टप्प्यात दिसून येत नाहीत. त्यामुळे महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करणे, वैद्यकीय सल्ला घेणे आणि लसीकरणाबाबत जागरूकता वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने घेतलेला हा उपक्रम ङ्गआरोग्यदायी माता - सशक्त समाजफ या ध्येयाकडे नेणारे एक मोठे पाऊल असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत आहे. गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची प्रमुख कारणे: असुरक्षित लैंगिक संबंध, हार्मोनल असंतुलन व औषधांचा दुरुपयोग, तणाव, प्रदूषण आणि चुकीचा आहार, वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव, ह्यूमन पॅपिलोमा व्हायरसचा संसर्ग.

# व्यायाम साहित्य व क्रीडा साहित्याकरिता प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्य क्रीडा विकास निधी अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच क्रीडा संघटना यांना बंदीस्त व्यायाम साहित्य, खुले व्यायाम साहित्य व क्रीडा साहित्य मिळविण्यासाठी प्रस्ताव दि. २० नोव्हेंबर २०२५ पर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत खाजगी अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, तसेच स्थानिक स्वराज्य संस्था, आश्रम शाळा, वस्तीगृहे, क्रीडा मंडळे, युवक व महिला मंडळे, पोलीस विभाग स्पोर्ट्स क्लब, ऑफिसर्स क्लब, शासकीय महाविद्यालये इत्यादी संस्था अनुदानासाठी पात्र असतील. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांची छाननी करून जिल्हा क्रीडा अधिकारी, बुलढाणा यांच्या शिफारशीसह संबंधित प्रस्ताव पुणे येथील क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडे पाठविण्यात येतील. संचालनालयात मंजुरीनंतर राज्य क्रीडा विकास निधी सहनियंत्रण समितीकडून मान्यता मिळाल्यानंतर मंजूर संस्थांना अनुदान वितरित करण्यात येईल. अटी व कागदपत्रे: व्यायामशाळेचे किमान क्षेत्रफळ ५०० चौ.फूट, तसेच प्रसाधनगृह व कार्यालय असणे बंधनकारक, संस्थेच्या



नावावर किमान ३० वर्षांचा नोंदणीकृत करार किंवा मालकी हक्काची जागा असणे आवश्यक, खुले व्यायाम साहित्याकरिता किमान १००० चौ.फूट जागा, कुंपण व गेटसह असावी. प्रस्तावासोबत संस्थेचा ठराव, घटनेची प्रत, संचालक मंडळ नोंदणी प्रमाणपत्र (१८६०/१९५०), जागेचे कागदपत्र व जीपीएस फोटो, हमीपत्र, साहित्य यादी, कव्हरिंग लेटर इत्यादी कागदपत्रे जोडावीत. अर्जाचा विहित नमुना दि. १७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत कार्यालयात उपलब्ध असून प्रस्ताव सादरीकरण दि. २० नोव्हेंबर २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावा. उशीरा प्राप्त प्रस्तावांचा विचार करण्यात येणार नाही, तसेच वरिष्ठ स्तरावरून मागविलेल्या कागदपत्रांची पूर्तता संबंधित संस्थांवर बंधनकारक राहील, असे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी कळविले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका शांत, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पडाव्यात - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील...

**जनसंचलन/बुलढाणा**

आगामी नगरपरिषद/नगरपालिका निवडणुक-२०२५ शांत, निर्भय, मुक्त आणि पारदर्शक वातावरणात पार पडाव्यात. तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सर्व संबंधित विभागांना प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश दिले आहेत. या संदर्भातील बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक, अपर जिल्हादंडाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क अधिकारी, विधी अधिकारी, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकारी उपस्थित होते.

प्रतिबंधात्मक उपाययोजना : पैशाची व मद्याची अवैध मार्गाने वाहतूक, मतदारांना प्रलोभन ठरतील अशा व अन्य संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथक ( ) तैनात करण्यात यावे. याकामी आवश्यक असलेले पोलीस कर्मचारी उपलब्ध करून देण्यात यावे. या पथकाने योग्य ती तपासणी करुन आवश्यक त्या वस्तू जप्त कराव्यात. नगरपालीका क्षेत्रांतील महत्वाचे नाके, इत्यादी जेथून मद्य /पैशाची अवैध वाहतूक तसेच मतदारांना प्रलोभन ठरतील अशा वस्तूंची/पैशांची वाहतूक होऊ शकते, अशा ठिकाणी चेक पोस्ट तयार करुन वरील पथक नेमावे. या पथकाने योग्य ती तपासणी करुन बेकायदेशीर वस्तू जप्त करुन नियमानुसार पुढील कारवाई करावी. या सर्व गोष्टींचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे. निर्भय, मुक्त व पारदर्शकरितीने निवडणुका घेण्यामध्ये अडथळा येऊ शकेल, अशा व्यक्तींची सराईत गुन्हेगार, गुंड प्रवृत्तीचे व्यक्ती, फरार घोषित करण्यात आलेले गुन्हेगार, संशयित व्यक्ती, जामीनावर सुटका केलेले अथवा पॅरोलवर असलेले व तत्सम इत्यादींची यादी तयार करुन त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये आवश्यक कारवाई करण्यात यावी. शांततेत निवडणुका पार पडाव्यात यासाठी वातावरण अनुकूल ठेवणे आवश्यक आहे. फ्लॅग मार्च, प्रसार माध्यम द्वारे कायदा अंमलबजावणीच्या तयारीची माहिती, गुंडांना आवर घालण्यासाठी खुले सराव शिबिरे आयोजित करणे इत्यादी उपक्रम राबवावेत. यापूर्वीच्या कोणत्याही निवडणुकीतील कायदा व सुव्यवस्था बिघडलेल्या संवेदनशील मतदान केंद्र व सभोवतालचा परिसर यावर लक्ष ठेवण्याबाबत विशेष काळजी घेण्यात यावी. आदर्श आचारसंहीतेचे पालन होईल या करीता मतदारांना प्रलोभन देणे, समाजाच्या विविध घटकांमध्ये तणाव निर्माण करणे, वाहनांचा गैरवापर, दारू विक्री, मालमत्तेचे विद्रुपीकरण, ध्वनीवर्धकांचा वापर, सार्वजनिक सभा व प्रचार यावर नियंत्रण ठेवावे. नामनिर्देशनपत्र भरताना कायद्याचे व आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये म्हणून पुरेसा बंदोबस्त ठेवण्यात यावा. आचारसंहिता भंगाची तक्रार स्विकारण्यासाठी व त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी आवश्यकते प्रमाणे कंट्रोल रुम/ कॉल सेंटरची स्थापना करण्यात यावी. मतदारांवर प्रभाव टाकण्याकरीता देण्यात येणाऱ्या वस्तू, मद्य () पैसा इत्यादींच्या वाटपावर लक्ष ठेवण्यासाठी रेल्वे, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क, इत्यादी विभागांशी समन्वय साधून रेल्वेस्थानक, हॉटेल्स, फार्महाऊस, रिसॉर्ट याठिकाणी होणाऱ्या पैशाच्या, मद्याच्या अवैध मार्गाने होणाऱ्या वाहतुकीवर व अन्य संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवावे. आचारसंहिता कालावधीमध्ये निवडणुकीच्या क्षेत्रामध्ये घडणाऱ्या महत्वाच्या घटना, गिरवणुका, प्रचार केन्या, सभा अथवा आचारसंहितेच्यादृष्टीने महत्वाच्या घटनांचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात यावे. पोलीस दलाने आपल्याकडे उपलब्ध व आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची निश्चिती करुन आवश्यक त्या ठिकाणी गृहरक्षक दल, गावसुरक्षा दल, राज्य राखीव दल यांची मदत घ्यावी. संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेशी संपर्क साधून मतमोजणी केंद्र व ईव्हीएम गोडावून यांची संयुक्त पाहणी करावी व सुरक्षीततेच्या दृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश जिल्हादंडाधिकारी यांनी दिलेत.

# वैज्ञानिक बलून उड्डाण; नागरिकांना सापडल्यास स्थानिक तहसिल, पोलीस स्टेशनला कळवावे - जिल्हा प्रशासनाचे आवाहन...

जनसंचलन/बुलढाणा

वैज्ञानिक संशोधन हेतूने बलून उड्डाणाचे २५ ऑक्टोबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत नियोजन करण्यात आले आहे. ही बलून साधने साधारण ३० किमी ते ४२ किमी उंचीवर जाऊन प्रयोग पूर्ण झाल्यानंतर पॅराशूटच्या माध्यमातून जमिनीवर उतरवली जातील. या उपकरणांचा बुलढाणा जिल्ह्यात उतरण्याची शक्यता दर्शविण्यात आली आहे. त्याअनुषंगाने नागरिकांना बलून उपकरणे आढळ्यास तातडीने स्थानिक तहसिल कार्यालय किंवा पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी केले आहे.टाटा मूलभूत संशोधन संस्था (), हैदराबाद, भारत सरकारच्या अणु ऊर्जा विभाग () आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था () यांच्या संयुक्त विद्यमाने वैज्ञानिक संशोधनासाठी बलून उड्डाणे करण्यात आले आहे. सदर बलून उड्डाणे जिल्ह्यात उतरण्याची शक्यता असल्याने जिल्हा प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत आणि वैज्ञानिक प्रयोगांचे महत्त्व लक्षात घेऊन तातडीच्या सूचना लागू करण्याचे निर्देश दिले आहे. ते याप्रमाणे.नागरिकांना बलूनची साधने किंवा पॅराशूटसह उपकरणे सापडल्यास साधने उघडू नयेत, हलवू नयेत किंवा त्यांच्यात छेडछाड करू नये. साधनांमध्ये असलेली महत्त्वाची वैज्ञानिक माहिती नष्ट होण्याची तसेच त्यावर असलेल्या उच्च विद्युत-दबावामुळे इजा होण्याची शक्यता आहे. सदर उपकरांची स्थानिक पोलीस स्टेशन, तहसिल कार्यालय व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांना त्वरित सूचना द्याव्यात. उपकरण सापडलेली ठिकाण, साधनांची स्थिती व उपलब्ध असेल तर शोधकर्त्यांचा संपर्क क्रमांक कळवावा. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय नियंत्रण कक्ष किंवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग मो. क्रमांक ७०२०४३५९५४ / ९०११७७७२२३ वर संपर्क साधावा.

# जिल्ह्यात कुष्ठरोग शोध मोहीम; कुष्ठरोगमुक्त बुलढाण्यासाठी सहकार्य करा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात एलसीडीसी कुष्ठरोग शोध मोहीम दि. १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत नागरिकांनी स्वेच्छेने तपासणी करून घ्यावी आणि कुष्ठरोग मुक्त जिल्हा निर्माण करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. कुष्ठरोग शोध मोहिमेच्या पूर्वतयारीसाठी जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक नुकतीच जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीला कुष्ठरोग सहाय्यक संचालक डॉ. हरी पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. के. व्ही. राठोड, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, बाह्यरुग्ण विभाग वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण घोंगटे तसेच जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी आणि इतर समिती सदस्य उपस्थित होते. मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील १८३६ पथकांमार्फत एकूण २३ लक्ष ७५ हजार २५६ नागरिकांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. नागरिकांनी या मोहिमेत सहकार्य करावे, घराघरात येणाऱ्या आरोग्य पथकांमार्फत कुष्ठरोगाची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. बैठकीत आरोग्य शिक्षण आणि जनजागृती कार्यक्रमांद्वारे बुलढाणा जिल्हा कुष्ठमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच, शासनाच्या गॅझेटनुसार कुष्ठरोग हा नोटीफायबल आजार घोषित असल्याने सर्व कुष्ठ रुग्णांची नोंद शासकीय दवाखान्यात करणे बंधनकारक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. जिल्ह्यातील सर्व खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी सात दिवसांच्या आत संबंधित रुग्णांची नोंद नजीकच्या सरकारी दवाखान्यात करावी, असा सूचना देण्यात आल्या.

# सहकार विद्या मंदिर मोताळा च्या विद्यार्थीनी घेतली गरुडझेप

जनसंचलन/ बुलढाणा

ग्रामीण भागात वसलेल्या मोताळ्यामधील सहकार विद्या मंदिरची माजी विद्यार्थीनी डॉ.मृणाल मधुकर मापारी हिने दुरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर वृत्तनिवेदिका म्हणून पदार्पण केले. तिच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. ङ्खङ्खजर तुमच्यामध्ये इच्छाशक्ती असेल तर तुम्हाला यश मिळविण्यापासून कोणीच रोखु शकत नाही हे डॉ. मृणाल हिने मिळविलेल्या यशातुन सिद्ध केले.ङ्खङ्ख सहकार विद्या मंदिर, मोताळा येथे डॉ. मृणाल मधुकर मापारी हिचे पुर्वप्राथमकि व प्राथमिक शिण सत्र २००५ ते २०१२ दरम्यान पुर्ण केले. डॉ. मृणाल हिची आई मोताळा येथील सहकार विद्या मंदिर मध्येच शिाका असल्यामुळे शिाणाची गोडी व आवड तिच्यामध्ये सुरवातीपासुन निर्माण झाली. सहकार विद्या मंदिर मध्ये सुरवातीपासुनच विद्याथ्र्यांना शिाणासोबत भारतीय संस्काराचे धडे देण्यात येतात. विद्याथ्र्यांच्या व्यक्तिमत्व विकास घडविण्याबाबत प्राथमिक शिाण देतेवेळीच मेहनत घेण्यात येते. डॉक्टर बनण्याचे स्वप्न लहापणापासूनच असल्यामुळे तिने बी.ए.एम.एस. चे शिाण घेत डॉक्टरची पदवी प्राप्त केली. हे सर्व शिाण घेत असतांना तिने आपले छंद, आवड जोपासली. कविता, नृत्य या कलांमध्ये प्राविण्य तर मिळविलेच पण सोबतच २०२५ चा मिस इंडिया, मिस नागपूर २०२० हे खिताब देखील मिळवित आपल्या शिरपेचात मानाचा तुरा प्राप्त केला. या यशावर न थांबता तिने निवेदिका म्हणून स्वत:ला डिजिटल मिडिया मध्ये प्रस्थापित करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. या तिच्या मेहनतीलाच यश प्राप्त होत तिची नुकतेच दुरदर्शनच्या



नागपूर सह्याद्री वाहिनीवर निवेदिका म्हणून झळकत चिंचपूर या मुळ गावाबरोबरच बुलढाणा जिल्ह्याचा मान वाढविला आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय पालकांना दिले आहे. बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा आदरणीय श्री. राधेश्यामजी चांडक (भाईजी), बुलढाणा अर्बनचे अध्या डॉ.श्री.सुकेशजी झंवर, बुलढाणा अर्बन चॅरिटेबल संस्थेच्या अध्या सौ. कोमल झंवर यांनी सहकार विद्या मंदिर, मोताळाच्या माजी विद्यार्थीनीने प्राप्त केलेल्या यशाबद्दल आनंद व्यक्त करीता तिला पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्यात.

# धावत्या ट्रकला आग; सोयाबीनचा माल वाचला!

जनसंचलन/ सिंदखेडराजा

जालना रस्त्यावर बुधवारी सकाळी धावत्या ट्रकच्या केबिनला अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत ट्रकची केबिन पूर्णपणे जळून खाक झाली; मात्र चालकाच्या प्रसंगावधानामुळे आणि अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे ट्रकमधील सोयाबीनचा माल थोडक्यात बचावला. बुधवारी सकाळी सुमारे आठच्या सुमारास शहरातून सोयाबीन घेऊन अहिल्यानगरकडे जाणारा ट्रक (क्र. एमएच-१५-एफव्ही-२५२७) जिजाऊ सृष्टी परिसरातून जात असताना केबिनमधून अचानक धूर निघू लागला. सुरुवातीला चालकाला याची जाणीव न झाल्याने ट्रक पुढे चालू राहिला. काही क्षणांतच आगीच्या ज्वाला निघत असल्याचे लक्षात येताच चालक रवींद्र बनकर यांनी तत्काळ ट्रक रस्त्याच्या कडेला बुधवारी सकाळी आठ वाजेच्या सुमाराची घटना, अग्नीशामक दलाचेही महत्वपूर्ण योगदान थांबवून बाहेर उडी मारली. चालकाने तात्काळ पोलिस व अग्निशमन दलाशी संपर्क साधला. सिंदखेडराजा पोलिस,



समृद्धी महामार्ग नियंत्रण कक्ष आणि नगर परिषदेचे अग्निशमन दल काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी ट्रकची केबिन पूर्णपणे ज्वाळांनी वेढली होती. शर्थीच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले; मात्र तोपर्यंत केबिन जळून खाक झाली होती. पोलिसांच्या माहितीनुसार, हा ट्रक मेहकर येथील व्यापाऱ्यांचा असून स्थानिक बाजार समितीतील खासगी व्यापाऱ्यांनी खरेदी केलेले सोयाबीन अहिल्यानगर येथे नेले जात होते. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसले, तरी शॉर्ट सर्किटची शक्यता वर्तवली जात आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. चालकाच्या तत्परतेमुळे आणि अग्निशमन दलाच्या वेळीच हस्तक्षेपामुळे मोठ्या आर्थिक नुकसानापासून बचाव झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८